आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१५ मे २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- महानगरपालिका निवडणुका लौकर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असून या निवडणुका महायुती एकत्रच लढणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- विधीमंडळानं संमत केलेल्या विधेयकांवर कार्यवाहीसाठी राज्यपालांना कालमर्यादा घालण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का, अशी राष्ट्रपतींची सर्वोच्च न्यायालयाकडे विचारणा
- सरकारनं जातनिहाय जनगणनेचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, अशी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची मागणी
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे बाराशे अंकांची वाढ

  **आणि**
- खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेचा आज समारोप /१५८ पदकं जिंकत महाराष्ट्र अव्वलस्थानी

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात महानगरपालिका निवडणुका वेळेवर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. ते आज पुण्यात महानगरपालिका अधिकाऱ्यांसाठीच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी गेले असता बातमीदारांशी बोलत होते. या निवडणुका महायुती एकत्रच लढवणार असून कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार अपवादात्मक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील असं ते म्हणाले.

**होल्ड--बाईट--मुख्यमंत्री**

मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्यसरकार लौकरच आपली भूमिका न्यायालयात मांडेल असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्किएच्या मालावर बहिष्कार टाकण्याच्या निर्णयाबद्दल पुण्यातल्या व्यापाऱ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं.

**<><><><><>**

राज्यविधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकांवर कार्यवाही करण्यासाठी राज्यपालांना कालमर्यादा  देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का, अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. तमिळनाडू विधानसभेनं मंजूर केलेली विधेयकं राज्यपालांकडे दीर्घ काळ प्रलंबित राहिल्याप्रकरणी दिलेल्या निवाड्यात सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं होतं की विशिष्ट कालावधीत राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेतला पाहिजे. त्या कालावधीत निर्णय घेतला नाही तर राज्यपालांची संमती गृहीत धरण्यात यावी असंही न्यायालयानं म्हटलं आहे.

त्यासंदर्भात १४ वेगवेगळे प्रश्न राष्ट्रपतींनी उपस्थित केले आहेत. संविधानाच्या कलम २०० आणि २०१ मधे राज्यपालांच्या कार्यपद्धतीविषयीच्या तरतुदी आहेत, मात्र त्यात अशी कालमर्यादा पाळण्याबाबतचा उल्लेख नाही. तसंच हा निर्णय राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या संविधानदत्त शक्ती आणि अधिकारांवर अतिक्रमण करणारा आहे का, याचा विचार करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जातनिहाय जनगणनेनंतर सर्वच समाज घटकांच्या आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो, म्हणून सरकारनं जनगणनेचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करून तेलंगणा

आणि कर्नाटक पॅटर्न राबवावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. जातनिहाय जनगणनेमुळे प्रत्येक समाज घटकाची लोकसंख्या समजेल, पाटीदार, गुर्जर, मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यात यामुळे मदत होईल. महाराष्ट्रात ओबीसींची संख्या २७ वरून वाढून ६४ टक्क्यापर्यंत जाऊ शकते, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादविरोधातली आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज केलं. ते आज जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यासाठी श्रीनगर इथे पोहोचल्यानंतर संरक्षण दलांना संबोधित करत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा दलांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये केलेल्या कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. संरक्षण मंत्री आणि देशाचा नागरिक या नात्याने सिंह यांनी संरक्षण दलांचे आभार मानले.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तानदरम्यान इतर कोणाच्या मध्यस्थीचा प्रश्नच उद्भवत नाही, असं ठाम प्रतिपादन परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जय शंकर यांनी केलं आहे. नवी दिल्लीत एका कार्यक्रमाच्या वेळी ते प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. पाकिस्तानशी चर्चा द्विपक्षीयच होईल , ती देखील काश्मीरमधे पाकिस्तानने केलेलं अतिक्रमण हटवण्याच्या मुद्द्यावरच असं त्यांनी स्पष्ट केलं. या संदर्भात भारताच्या भूमिकेत काहीही बदल झालेला नाही आणि या मुद्यावर कायम देशभरात सहमती आहे असं ते म्हणाले. **<><><><><>**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं पाकिस्तानी झेंडे आणि संबंधित वस्तूंच्या विक्रीबद्दल Amazon India, Flipkart, Ubuy India, एटसी,

द फ्लॅग कंपनी आणि फ्लॅग कॉर्पोरेशन यांना नोटीस बजावली आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली आहे. अशी असंवेदनशीलता खपवून घेतली जाणार नाही. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना अशी सर्व सामग्री त्वरित काढून टाकण्याचे आणि राष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. असं त्यांनी म्हटलं आहे.

पुण्यातल्या सुका मेवा व्यापाऱ्यांनीही तुर्कीएमधून येणाऱ्या सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला आहे. पुणे मार्केट यार्ड परिसरातल्या व्यापारी संघटनेनं आधी देश नंतर व्यापार, अशी भूमिका घेतली आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भाजपातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे.

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथंही आज तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं. आमदार नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली शहरातल्या मंडीबाजार इथून सुरू झालेली ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, सदर बाजार, भगवान बाबा चौक या मार्गानं जात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक इथं तिचा समारोप झाला.

बीड जिल्ह्यात परळी इथं, तसंच अहिल्यानगर जिल्ह्यात कोपरगाव इथंही आज भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज बाराशे   अंकांनी वधारला आणि ८२ हजार ५३१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३९५  अंकांनी वधारला आणि २५ हजार ६२  अंकांवर बंद झाला.

धातू, वाहन उद्योग, माहिती तंत्रज्ञान आणि बांधकाम क्षेत्रातल्या समभागांची आज मोठ्या प्रमाणात खरेदी झाली. त्यामुळे आज दिवसभरात सेन्सेक्सनं  चौदाशे अंकांचा उच्चांक नोंदवला.

शेअर बाजारात आज सुरुवातीच्या सत्रात घसरण दिसून आली. मात्र जागतिक बाजारातली मजबूत स्थिती आणि भारत-अमेरिका व्यापार करारबाबतचा आशावाद, यामुळे नंतर गुंतवणूकदारांमध्ये उत्साह वाढल्याचं बाजार विश्लेषकांनी सांगितलं.

**<><><><><>**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धांची आज सांगता होत आहे. बिहारमधे पटना इथं पाटलीपुत्र क्रीडा प्रेक्षागृहात हा सोहळा सुरू आहे. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, इतर प्रशासकीय अधिकारी, क्रीडाक्षेत्रातले इतर मान्यवर या सोहळ्याला उपस्थित आहेत.

या स्पर्धेत ५८ सुवर्ण आणि ४७ रौप्य पदकांसह १५८ पदकं मिळवून महाराष्ट्र पदकतालिकेत अग्रस्थानी आहे. हरियाणाने जोरदार कामगिरी करत ३९ सुवर्ण आणि २७ रौप्य पदकांसह एकूण ११७ पदकं मिळवून दुसरे स्थान पटकावलं. राजस्थान २४ सुवर्ण पदकांसह ६० पदकं मिळवून तिसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रानं काल ॲथलेटिक्स   स्पर्धेत दहा सुवर्ण पदकांसह १५ पदकं मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली.

**<><><><><>**

राष्ट्रीय नामांकित बाजाराच्या अनुषंगानं राज्यस्तरीय बाजारांचा विकास करताना राज्यातल्या शेतकऱ्यांचं हित, तसंच बाजार समिती सदस्यांच्या अधिकारांचं रक्षण झालं पाहिजे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिल्या. कृषी उत्पन्न बाजार समित्यासंदर्भात विविध प्रश्नांवर आज मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुनच याबाबत निर्णय घ्यावा, असे निर्देश पवार यांनी दिले.

**<><><><>**

जलसंपदा विभागाची दोन्ही महामंडळं स्वयत्त केली जाणार असून ही प्रक्रिया करण्यासाठी एक समिती स्थापन करणार असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं. गोदावरी पाटबंधारे विभागाची बैठक आज छत्रपती संभाजीनगर इथं झाली, त्यावेळी ते बोलत होते. महामंडळांना स्वायत्त केलं तर त्यांच्या उपलब्ध साधनांचा वापर करुन निधी वाढवण्यासाठी प्रयत्न करता येतील. त्यासाठी महामंडळाचं स्वतंत्र पर्यटन विकास धोरण राबवलं जाईल, धरणाचं लाभ क्षेत्र, फुगवटा क्षेत्र इथं पर्यटन स्थळांचा विकास करुन पर्यटनाला चालना दिली जाईल, सर्व धरणांवर फ्लोटिंग सोलर बसवून उर्जा निर्मिती केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

सुरक्षित प्रवासासाठी एसटी महामंडळ तीन हजार स्मार्ट बसगाड्या खरेदी करणार असल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बसगाड्यांमधे कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित कॅमेरे, जीपीएस तंत्रज्ञान, वायफाय, टीव्ही, बस लॉक प्रणाली, आग प्रतिबंधक यंत्रणा असेल.

या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेबरोबरच बसच्या अपघातांची संख्या कमी करणं, तसेच वक्तशीरपणा वाढवायला देखील मदत होणार आहे, असं सरनाईक म्हणाले.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीरामपूर एमआयडीसी परिसरात पोलिसांनी काल रात्री केलेल्या कारवाईत कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले. **<><><><><>**

पुढचा आठवडाभर राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. अहिल्यानगर, पुणे, सातारा, बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये आज जोरदार पावसाची शक्यता असून, या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.